# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक रानिआ-१०९७/प्र.क्र. १३७/९७/पंरा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २९ सप्टेंबर, १९९७.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,

विषय.--ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका १९९७
निवडणुकांमधील अडी-अडचणी....

महोदय,

ग्रामपंचायतींच्या सार्वत्रीक निवडणूका १९९७ च्या कामकाजाचा आढावा तसेच प्रत्यक्ष निवडणूका घेण्याच्या कामात आलेले अनुभव व अडचणी जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांसमवेत नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या प्रत्यक्ष निवडणुका घेणाऱ्या अधिकाऱ्यांसमवेत दिनांक ११ सप्टेंबर, १९९७ रोजी बैठक घेण्यात आली. त्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे :--

| मुद्दा क्र. | मुद्दा | मार्गदर्शन |
|---|---|---|
| १. | ग्रामपंचायतीच्या निवडणूक काळातील आचारसंहितेबाबत व तिचे पालन याबाबत आयोगाचे मार्गदर्शन घ्यावे. | राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ३ फेब्रुवारी, १९९७ च्या पत्रान्वये आचार संहिता व तिचे पालन याबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. या मार्गदर्शनाची प्रत राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातून उपलब्ध होऊ शकेल. |
| २. | मतपत्रिकेच्या पाठीमागे मारण्यात येणाऱ्या विभेदक चिन्हाबाबतचे आदेश आयोगाकडील पत्र दिनांक ५ ऑगस्ट १९९७ अन्वये देण्यात आलेले आहे. त्यानुसार गोलाकार वर्तुळात वरच्या बाजूला वार्ड नंबर व त्याखाली मतदान केंद्र क्रमांक नमूद करून त्याप्रमाणे शिक्के तयार करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु त्यावरुन सदर मतपत्रिका ही कोणत्या ग्रामपंचायतीची आहे याचा बोध होणार नाही. तसेच एकामतदान केंद्रावर किती मतदारसंख्या असावी याबाबत आदेश नसल्याने प्रत्येक ग्रामपंचायतीचे वार्ड हेच मतदान केंद्र असल्याने प्रत्येक वार्डात एकच मतदान केंद्र आहे. प्रत्येक तालुक्यात पंयचायतींची संख्या जास्त असल्याने राज्य निवडणूक आयोगाने प्रत्येक पंचायतीस विशिष्ट कोडनंबर (विधानसभा मतदार संघाप्रमाणे) द्यावा व त्याप्रमाणे गोलाकार वर्तुळात वरच्या बाजूस सदर ग्रामपंचायतीच्या कोड नंबर व खाली वार्ड नंबर नमूद करावा तसेच गोलाकार अकारात ग्रामपंचायतीचे नाव व तालुक्याचे नाव नमूद करावे जेणे करून सदर शिक्क्यावरून सदर मतपत्रिका ही कोणत्या तालुक्यातील कोणत्या ग्रामपंचायतीच्या कोणत्या वार्डातील आहे, यांचा स्पष्ट बोध होईल व तयार केलेले शिक्के हे कायमस्वरूपी वापरांत राहतील असे मत आहे. तरी याबाबत प्रस्ताव आयोगासमोर मांडण्यात यावा असे मत आहे. | राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार विभेदक चिन्हे तयार करून वापरण्यात यावीत. |

| मुद्दा क्र. | मुद्दा | मार्गदर्शन |
| --- | --- | --- |
| ३. | मतमोजणी करताना निकाल जाहिर करते वेळी कोणत्या नियमांचे पालन करावे व कशाप्रकारे निकाल जाहीर करावायाबाबत आयोगाने मार्गदर्शन करावे. | मतमोजणी करताना निकाल जाहिर करतेवेळी मुंबई ग्रामपंचायती निवडणूक नियमामधील तरतुदीनुसारच निकाल जाहिर करावे लागतील. निवडणूक नियम ३४ मध्ये नमूद केल्यानुसार नोंदविलेल्या मतदारांची संख्या विवरणपत्र भरून झाल्यानंतर निवडणूक अधिकाऱ्याने प्रथम राखीव जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागरिकांना मागासप्रवर्ग यामध्ये सर्वात अधिक मते पडली असतील अशा उमेदवारांना निर्वाचित निकाल जाहीर केला पाहीजे. तद्नंतर स्त्रीयांच्या साठी राखीव असलेल्या अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांच्या इतर मागास प्रवर्गातील स्त्रीया यांना राखून ठेवलेल्या जागांचे निकाल प्रथम जाहीर केले पाहीजेत. तद्नंतर सर्व साधारण स्त्री राखीव जागेचा निकाल जाहीर केल्यानंतर अराखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचा निकाल जाहीर करावयाचा आहे. अशा प्रकारचा निकाल जाहीर करणे हे नियम ५ च्या उपबंधास अधिन राहील. |
| ४. | उमेदवाराच्या निवडणूक खर्चाबाबत आयोगाने मार्गदर्शन करावे. | आयोगाचे आदेश क्रमांक SEC/1095/101/DESK-3, दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ नुसार ग्रामपंचायतींच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीसाठी खर्च करण्याची मर्यादा रक्कम रु. ५,००० आहे व या खर्चाचा हिशोब निवडणूक निकाल जाहिर झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत सादर करावयाचा असून याबाबत भंग झाल्यास भारतीय दंड संहिता कलम १७१-आय खाली त्याबाबत कार्यवाही करावयाची आहे. |
| ५. | निवडणूक कामी अत्यंत अल्प प्रमाणात अनुदान प्राप्त झालेले आहे. तसेच निवडणूक कामी आवश्यक असणारे विविध प्रकारच्या साहित्यांची मागणी इकडील पत्र क्र. ग्राप/कक्ष-२/१०४२/९७ दि. ६ ऑगस्ट १९९७ अन्वये शासकीय मुद्रणालय मुंबई यांचेकडे करण्यात आलेली होती. परंतु सदर मागणीबाबत व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. निवि/ जेए-५/ निवडणूक/४३०९/९७-९८ दिनांक ५ सप्टेंबर १९९७ अन्वये वरील साहित्याचा पुरवठा मुदतीत करणे शक्य होणार नसल्याने विविध प्रकारच्या फार्मची छपाई स्थानिकरित्या करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे जास्त अनुदानाची गरज भासणार आहे. त्यामुळे शासन स्तरावरुन पुरेसे अनुदान मिळणेस आयोगाकडून शासनास पाठपुरावा व्हावा, असे मत आहे. | आयोगाकडून अनुदानाच्याबाबत शासनास आयोगाकडून पाठपुरावा करण्यात येतो. तथापि जिल्हाधिकारी व संबंधित विभागीय आयुक्त ह्यांनीच ह्या कामीसतत पाठपुरावा करून आवश्यक ते अनुदान उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. |
| ६. | तहसिलदार यांच्या निवडणूक कामासंबंधात येणाऱ्या अडचणीबाबत आयोगाने मार्गदर्शन करावे. अनुसूचित क्षेत्रातील नागरिकांचा मागास प्रवर्गातील रिक्त जागा या ७ ऑक्टोबर १९९७ रोजीच्या कायद्यानुसार नव्याने निश्चित करून त्याबाबतच्या पोट-निवडणूका घ्याव्यात किंवा कसे. | रिक्त जागांचे स्वरुप ज्याप्रमाणे सार्वजनिक निवडणूका घेतल्या गेल्या होत्या, तेव्हा होते त्या प्रमाणेच पोट निवडणूका घ्याव्या लागतील. सुधारित कायद्याप्रमाणे त्या जागा नव्याने निश्चित करता येणार नाहीत. |

| मुद्दा क्र. | मुद्दा | मार्गदर्शन |
|---|---|---|
| ७. | राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी जिल्हास्तरावर बोटाला लावावयाची इंडीबेल इंक स्थानिक स्तरावर खरेदी करणेची परवानगी दिलेली असून मत पेट्यांसाठी आवश्यक असणारे पेपरसिलही स्थानिकरित्या छपाई करण्याची परवानगी दिलेली आहे. पेपरसिलची छपाई करताना त्यात विशिष्ट कोड नंबर विशिष्ट रंग वापरांचा किंवा कसे याबाबत आयोगाने मार्गदर्शन करावे व नमुना विहित केलेला असल्यास पुरावा. | जिल्हापरिषद व ग्रामपंचायतीच्या निवडणूकांच्या वेळी पेपरसिल छपाई करताना वापरण्यात आलेले कोड नंबर व निळा रंग व मध्यावर जिल्हा परिषदेच्याऐवजी ग्रामपंचायत असे छापलेले पेपरसिल छापून घ्यावे. |
| ८. | प्रभाग रचनेच्या प्रस्तावाबाबतच्या नमुना ' अ ' ची अंतीम अधिसूचना प्रसिद्ध केल्या नंतर त्याविरूद्ध जर काही व्यक्ती मुंबई उच्च न्यायालयात काही प्रकरणात गेल्या व न्यायालयाकडून निवडणुकीस स्थगिती आल्यास काय करावे ? याबाबत मार्गदर्शन घेण्यात यावे. | भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-ओ मधील तरतुदीनुसार अनुच्छेद २४३-के अन्वये पंचायत निवडणुकीची करण्यात येणारी प्रभाग रचना, सदस्य संख्या निश्चित करणे, ह्या बाबींविरूद्ध कोणत्याही न्यायालयात दाद मागण्यास प्रतिबंध (bar) करण्यात येत आहे. त्यामुळे या विषयावर उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल झाल्यास वरील अनुच्छेद २४३-ओ उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात यावा व मनाई हुकूम उठवून घेण्याचा प्रयत्न करावा. मनाई हुकूमाचा अंमल सुरू असे पावेतो निवडणूक घेता येणार नाही. |

आपली

**(अपर्णा जोशी)**

अवर सचिव,

राज्य निबणूक आयोग, महाराष्ट्र.